# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. २
## सभावृत्तांत

दिनांक :- १२/०९/२०१७ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक १२/०९/२०१७ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सचिन बाजीराव चिंचवडे अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा. प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा. संगिता राजेंद्र भोडवे
५. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.सुरेश शिवाजी भोईर
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील
९. मा.राजेंद्र तानाजी गावडे
१०. मा.निता विलास पाडाळे
११. मा.उषा दिलीप काळे
१२. मा.संतोष अंकुश कोकणे

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव - प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.देवण्णा गटटुवार, - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा. एकनाथ पाटील – प्र. कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.डॉ.सतिश गोरे – पशुवैदयकिय अधिकारी , मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य , मा..सी.एन.धानोरकर – स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.आर.एम.पवार – उपअभियंता जलनिसारण विभाग श्री.के.डी.दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, मा.के.बी.पारोल – मुख्य आरोग्य निरिक्षक, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष श्री.सचिन बाजीराव चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

**तदनंतर उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रातील लिंकरोड तानाजीनगर कालिका माता मंदिरासमोर चिंचवडकडे जातांना डाव्या बाजूला बस थांबा आहे. सदरचा बस थांबा वळणावर असून त्यामुळे वाहतुकीचा वारंवार खोळंबा होतो व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच त्या ठिकाणी वारंवार अपघात होत असतात. यामुळे सदरचा बस थांबा पिंपरीकडील बाजूस ५० मीटर अंतरावर स्थलांतरीत करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ मौजे-चिंचवड वाल्हेकरवाडी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील जकात नाका चौक ते रावेत वाल्हेकरवाडी शिवनाला पर्यंतचा ३४.५० मीटर रस्त्यापैकी स.नं.११२ ते स.नं.१२२ पर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये मनपा रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ मौजे रहाटणी स.नं.७९ पै. मधील सि.स.नं.५८३५ लगतचा ६.० मी. रुंदीचा घोषीत रस्ता रदद करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ मौजे – रहाटणी येथील स.नं.८२ पै. ८३ पै. मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित रस्त्याचे स्थानात बदल करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ काळेवाडी प्रभाग क्रमांक २२ मध्ये स्मशानभुमीमध्ये सोलर वॉटर हिटर बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.संतोष कोकणे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ३ | विषय क्र. १
दि. १२/९/२०१७ | विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.सुरेश भोईर | अनुमोदक: मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

संदर्भ :- मा.सुरेश भोईर यांचा दिनांक ७/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

केशवनगर मनपा शाळा जवळ असलेल्या महापालिका सांस्कृतिक हॉलची जागा ही भोईर परिवाराची होती. सदर जागेमध्ये महानगरपालिकेने नवीन सांस्कृतिक हॉल निर्माण केलेला असून, सदरच्या हॉल ला अदयाप कोणतेही नामकरण केलेले नसून सदर हॉलचे कै.शिवाजी उर्फ नाना रामभाऊ भोईर असे नामकरण करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४ | विषय क्र. २

दि. १२/९/२०१७ | विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सुरेश भोईर | अनुमोदक: मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

संदर्भ :- मा.सुरेश भोईर यांचा दिनांक ७/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

सर्व्हे नं.२६८ लक्ष्मीनगर पिंपरी लिंकरोड येथील जागा ही गावडे परिवाराची होती. सदर जागेत महानगरपालिकेचे आरक्षण असून, महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे. सदर जागेस उदयानासाठी आरक्षीत असून, भविष्यात करण्यात येणा-या नवीन उदयानाला कै.मुरलीधर पंडितराव गावडे असे नामकरण करणेकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता, सदर आरक्षण जागेत उदयान विकसित झाले नसल्याने सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५ | विषय क्र. ३

दि. १२/९/२०१७ | विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.राजेंद्र तानाजी गावडे | अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.राजेंद्र तानाजी गावडे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रातील लिंकरोड तानाजीनगर कालिका माता मंदिरासमोर चिंचवडकडे जातांना डाव्या बाजूला बस थांबा आहे. सदरचा बस थांबा वळणावर असून त्यामुळे वाहतुकीचा वारंवार खोळंबा होतो व वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच त्या ठिकाणी वारंवार अपघात होत असतात. यामुळे सदरचा बस थांबा पिंपरीकडील बाजूस ५० मीटर अंतरावर स्थलांतरीत करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६ | विषय क्र. ४

दि. १२/९/२०१७ | विभाग – नगररचना व विकास विभाग

सुचक : मा.करुणा शेखर चिंचवडे | अनुमोदक: मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

संदर्भ :- मा.करुणा चिंचवडे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिनांक २५/७/२०१७ रोजी मा.आयुक्त कार्यालयात पिंपरी चिंचवड मनपा व प्राधिकरण यांचेमध्ये झालेल्या आढावा बैठकीनुसार मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील जकात नाका चौक ते रावेत वाल्हेकरवाडी शिवनाला पर्यंतचा ३४.५० मी.रस्त्यापैकी स.नं.११२ ते स.नं.१२२ पर्यंतचा रस्ता तातडीने विकसित करणेबाबत सोबत जोडलेल्या नकाशात जांभळया रंगाने दर्शविल्याप्रमाणे वाल्हेकरवाडी गावठाण लगतच्या स.नं.८७ , स.नं.१६६ मधील पेट्रोल पंपापर्यंत सदर रस्त्याची आखणी कायम करुन तसेच तेथून पुढे रावेत चिंचवड शिवनाल्यापर्यंत सोबतच्या नकाशामध्ये जांभळया रंगाने दर्शविल्याप्रमाणे रस्त्याची आखणी कायम झालेबाबत निर्णय झालेला आहे. तरी सदर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची मंजूर विकास योजनेतील जकात नाका चौक ते रावेत वाल्हेकरवाडी शिवनालापर्यंतचा ३४.५० मीटर रस्त्यापैकी स.नं.११२ ते स.नं.१२२ पर्यंतच्या कायम केलेल्या रस्ता आखणीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता सदर कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७
दि. १२/९/२०१७
सुचक : मा.निता विलास पाडाळे

विषय क्र. ५
विभाग – नगररचना व विकास विभाग
अनुमोदक: मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मौजे रहाटणी स.नं.७९ पै. पिंपरी काळेवाडी मुख्य रस्त्यापासून (पाचपीर चौक काळेवाडी) सि.नं.५७९७ व सि.स.नं.५७९५ मधून ९.० मी. रुंदीचा रस्ता असून, तो पुढे ६.० मी.रुंदीचा आहे. सदरचा रस्ता पुढे डावीकडे सि.स.नं..५८३५ लगत झेड आकारात दर्शविला आहे. सदरचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करणेत आला आहे. सदरचा झेड आकारातील रस्ता हा ४५ मी. लांबीचा रस्ता हा अस्तित्वातील इमारतींवरुन जात आहे. त्यामुळे सदरचा झेड आकारातील सुमारे ४५ मी. लांबीचा घोषित रस्ता रदद करणेकामीच्या प्रस्तावाचा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८
दि. १२/९/२०१७
सुचक : मा.निता विलास पाडाळे

विषय क्र. ६
विभाग – नगररचना व विकास विभाग
अनुमोदक: मा.अश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मौजे – रहाटणी येथील स.नं.८२ पै. व ८३ पै. मध्ये यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये अन्ड्रो नायगत / विदया चव्हाण यांचे घरापासून ते गुरुनाथ महाशेटटे / तुकाराम जाधव यांचे घरापर्यंत ६.० मी. रुंदीचा रस्ता घोषीत करणेत आलेला आहे. सदर रस्त्याच्या जागेत मोठया प्रमाणात बांधकामे असून, त्यामुळे रस्तारुंदीकरणास जागा मिळण्यास अडचणी आहेत. त्यामुळे सदरचा घोषीत रस्ता रदद करुन त्याऐवजी उत्तर दिशेस स.नं.८३ पै. मध्येच अस्तित्वात असलेल्या विदया चव्हाण / रामचंद्र जाधव व जगदीश राठोड यांच्या घरापासून ते गुरुनाथ महाशेटटे / सुनिल अल्हाट यांचे घरापर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषीत करणेकामीच्या प्रस्तावाचा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ९
दि. १२/९/२०१७
सुचक : मा.संतोष अंकुश कोकणे

विषय क्र. ७
विभाग – विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.उषा दिलीप काळे

संदर्भ :- मा.संतोष कोकणे यांचा दिनांक १२/९/२०१७ रोजीचा प्रस्ताव

काळेवाडी प्रभाग क्रमांक २२ मध्ये स्मशानभुमीमध्ये सोलर वॉटर हिटर बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले तदनंतर मा. सचिन बाजीराव चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सचिन बाजीराव चिंचवडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/९६/२०१७.
दिनांक :१८/ ०९ /२०१६

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना